**मा.न्यायमूर्ती श्री.संदीप शिंदे (निवृत्त) यांचे अध्यक्षतेखालील गठीत समितीस मुदतवाढ देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : मआसु- २०२३/प्र.क्र.०३ (भाग-१)/आरक्षण-५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५ जून, २०२६

संदर्भ :

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.मआसु-२०२३/प्र.क्र.३/आरक्षण-५ (१६-क), दि.०७.०९.२०२३
२. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.मआसु-२०२३/प्र.क्र.३/आरक्षण-५ (१६-क), दि.०३.११.२०२३
३. समक्रमांकित दि. ३१ डिसेंबर, २०२५ रोजीचा शासन निर्णय

**शासन निर्णय :**

मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक त्या अनिवार्य पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करण्याबाबत तसेच, तपासणीअंती पात्र व्यक्तींना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती विहित करण्यासाठी संदर्भ क्र.१ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयान्वये मा.न्यायमूर्ती श्री.संदीप शिंदे (निवृत्त) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली. सदर समितीची कार्यकक्षा संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये संपूर्ण महाराष्ट्रभर करण्यात आली आहे. संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये सदर समितीस दि.३०.०६.२०२६ पर्यंत देण्यात आलेली मुदतवाढ संपुष्टात येणार आहे.

२. मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संलग्न बाबींवरील शिफारशींवर करावयाच्या कार्यवाहीबाबत मा. मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२२.०८.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे.

३. सदर मंत्रिमंडळ उप समितीच्या दि.०२.०६.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत मा. न्यायमूर्ती श्री. संदीप शिंदे (निवृत्त) यांचे अध्यक्षतेखाली समितीस १ वर्षाची मुदतवाढ देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. या अनुषंगाने शासन दि. १ जुलै, २०२६ पासून पुढे १ वर्ष म्हणजेच **दि.३० जून, २०२७ पर्यंत मा.न्यायमूर्ती श्री.संदीप शिंदे (निवृत्त) समितीस मुदतवाढ देत आहे.**

४. मा. न्यायमूर्ती श्री. संदीप शिंदे (निवृत्त) यांना समितीच्या कामकाजासंदर्भात दरमहा रू. ४,००,०००/-(अक्षरी रू चार लक्ष फक्त) इतके मानधन अनुज्ञेय राहील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०६२५१०५३१०८९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUNIL RAMCHANDRA JOSHI

Digitally signed by SUNIL RAMCHANDRA JOSHI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=AD8BA7A62C6741C5593F2F7235FD3E502DB0357ADD7D7D5B1AADE6E95F1AE303, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BB3E05076F2BAD1FB73FC2519D9FD2C90E57447E3369134F53712F8184BAAF7E, cn=SUNIL RAMCHANDRA JOSHI
Date: 2026.06.25 10:54:13 +05'30'

**(सुनील रा. जोशी)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३ मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव
४) मा.उप मुख्यमंत्री (गृह, विधि व न्याय) यांचे सचिव
५) मा.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव
६) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा
७) सर्व विधानसभा सदस्य/ विधानपरिषद सदस्य
८) मा.न्यायमूर्ती श्री संदीप शिंदे (निवृत्त)
९) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
१०) अपर मुख्य सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई (समिती सदस्य)
११) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई (समिती सदस्य)
१२) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१३) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा/विधानपरिषद)
१४) सर्व विभागीय आयुक्त (समिती सदस्य)
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१६) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१७)आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
१८)आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
१९) सर्व जिल्हाधिकारी तथा समिती सदस्य.
२०) सह सचिव (कार्या-आरक्षण-५), सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई (सदस्य सचिव)
२१) सह सचिव (प्रशा-१), सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई
२२) उप सचिव, मा.न्या.श्री.शिंदे समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई.
२३) निवडनस्ती.